# हिंद सेवा मंडळ, अहमदनगर
## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना – (फक्त सभासदांसाठी)

हिंद सेवा मंडळ, अ.नगर या शैक्षणिक संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. ०२/०४/२०१७** रोजी **सायंकाळी ५=०० वाजता चंदनमल सुराणा कला मंदिर, दादा चौधरी विद्यालय, कोर्ट गल्ली, अ.नगर** येथे हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष **श्री. शिरीष दामोदर मोडक** यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. त्यासभेमध्ये खालीलप्रमाणे कामकाज होईल. तरी मंडळाच्या सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### * सभेपुढे येणारे विषय *

**विषय नं. ०१:–** दि. २४/०४/२०१६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त कायम करणे. (या सभेच्या इतिवृत्ताची प्रत संस्थेच्या कार्यालयात अवलोकनार्थ ठेवली आहे. ती सभासदांना कामकाजाच्या दिवशी दुपारी १२ ते ०३ या वेळेत दि. २०/०३/२०१७ ते २९/०३/२०१७ या कालावधीत सुट्टीचे दिवस सोडून पहावयास मिळेल. त्यामुळे इतिवृत्त सभेत वाचले जाणार नाही.)

**विषय नं. ०२ :–** मंडळाचे व मंडळाच्या सर्व संलग्न शाळा / कॉलेजचे एकत्रित केलेले व हिशोबतपासनीस यांनी प्रमाणित केलेले सन २०१५–२०१६ सालचे जमाखर्च व ताळेबंद यांस मंजूरी देणे.

**विषय नं. ०३ :–** सन २०१५–२०१६ सालच्या मंडळाच्या सर्व शाखांच्या कामकाजासंबधी कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या अहवालास मंजूरी देणे.

**विषय नं. ०४ :–** सन २०१६–२०१७ या सालासाठी हिशोब तपासणीसाठी हिशोब तपासनीसाची नेमणूक करणे व मुशाहिरा ठरविणे.

**विषय नं. ०५ :–** मंडळाच्या सन २०१६–२०१७ सालच्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

**विषय नं. ०६ :–** मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

अहमदनगर
दि. १७/०३/२०१७

**सुनिल रामदासी**
मानद सचिव
हिंद सेवा मंडळ, अहमदनगर

---

**टिप :–**

१) ज्या सभासदांनी सन २०१५–२०२० सालची वर्गणी दिलेली असेल त्यांनाच या सभेस उपस्थित राहता येईल.

२) सभेपुढील विषयांच्या कामकाजासंबंधीची कागदपत्रे मंडळाच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी दुपारी १२ ते ०३ या वेळेत दि. २०/०३/१७ ते २९/०३/२०१७ या कालावधीत (सुट्टीचे दिवस सोडून पहावयास मिळतील.)

३) वरील सभेच्यावेळी सभेपुढे वर नमूद केलेल्या विषयाबद्दल काही प्रश्न विचारावयाचे असल्यास दि. २९/०३/२०१७ पर्यंत मंडळाच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावेत. दि. २९/०३/२०१७ नंतर आलेल्या अगर सभेच्या ठिकाणी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सभेत दिली जाणार नाहीत.

४) गणसंख्यापूर्तिच्या अभावी सभा तहकूब झाल्यास तहकूब झालेली सभा त्याच दिवशी सायंकाळी ५=३० वाजता घटनेतील तरतुदीनुसार घेतली जाईल. अशा सभेस गणसंख्येची पूर्तता नसली तरी त्या सभेचे कामकाज कार्यक्रम पत्रिकेत नमूद केल्याप्रमाणे होईल.

५) सभासदांना नम्र विनंती की, सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी अहवालाची वेगळी प्रत देण्यात येणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने अहवालाची प्रत बरोबर आणावी.

# ।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।

## तेज : पुंज ज्योति जयांची मालवली
## तयांचे चरणी वाहतो श्रध्दांजली

अहवाल सालामध्ये जे जागतिक भारतीय किर्तीचे राजधुरंधर, ज्ञात व अज्ञात नेते, कलावंत, भारतीय लष्करी अधिकारी व सैनिक, शिक्षण तज्ञ, संशोधक, शास्त्रज्ञ, साहित्यिक, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, देशभक्त, कवी, लेखक, खेळाडू, हिंद सेवा मंडळाचे सभासद, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, माजी संचालक, हितचिंतक, पालक व विद्यार्थी, जे कोणी दिवंगत झाले त्यांना तसेच विविध दुर्घटनामध्ये, आतंकवादी हल्ल्यामध्ये तसेच अपघातामध्ये बळी पडलेल्या निराधार नागरिकांना ही सभा आदरपूर्वक अभिवादन करुन भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.



।। कर्मण्येवाधिकारस्ते ।।

# हिंद सेवा मंडळ, अहमदनगर

बोरकर नगर, सारडा महाविद्यालय प्रांगण, सावेडी रोड, अहमदनगर फोन नं. २४३१६२७

## ● सन २०१५-२०१६ सालातील पदाधिकारी व कार्यकारी मंडळ ●

**• अध्यक्ष •**

प्रा.शिरीष दामोदर मोडक

**• उपाध्यक्ष •**

श्री. महेंद्र मोहनीराज गंधे
श्री. अनंत गंगाधर पाठक
ॲड. सुधीर राजाराम झरकर
श्री. रणजित रुपचंद श्रीगोड

**• कार्याध्यक्ष •**

श्री. ब्रिजलाल झुंबरलाल सारडा

**• उपकार्याध्यक्ष •**

ॲड. अनंत रामचंद्र फडणीस
सौ. रोहिणी अरविंद शिवलकर

**• मानद सचिव •**

श्री. सुनिल भगवान रामदासी

**• सह सचिव •**

श्री. अजित सिमरतलाल बोरा
डॉ. रमेश मुरलीधर झरकर
डॉ. पारस देवीचंद कोठारी
श्री. संजय दादा जोशी
श्री. मधुसूदन झुंबरलाल सारडा
श्री. अनंत त्रिंबक भाटे

**• कार्यकारी मंडळ •**

श्री. वसंत हस्तीमल लोढा
श्री. अशोक उर्फ बस्तीराम हनुमानदास उपाध्ये
श्री. सुमतीलाल बन्सीलाल कोठारी
श्री. मकरंद विष्णु खेर
श्री. सुरेश तात्याबा चव्हाण
श्री. अनिल बाळकृष्ण देशपांडे
श्री. जगदीश रुपनारायण झालानी
श्री. सुजित श्रीकांत बेडेकर
श्री. अरुणकुमार मुकनदास दुगड
श्री. रमेश बन्सीलाल सारडा

**• सेवक प्रतिनिधी •**

श्री. विठ्ठल बाळू उरमुडे
श्री. प्रा. राजेंद्र यशवंतराव शिंदे
श्री. कल्याण नामदेव लकडे
श्री. विठ्ठल मारुती ढगे
श्री. सचिन किसनराव मुळे
श्री. नवनाथ राजाराम जंगले

**• सहाय्यक सचिव •**

श्री. मोहन मधुकर गायकवाड
श्री. बाळासाहेब उध्दवराव कुलकर्णी

।। कर्मण्येवाधिकारस्ते ।।

# हिंद सेवा मंडळ, अहमदनगर

बोरकर नगर, सारडा महाविद्यालय प्रांगण, सावेडी रोड, अहमदनगर फोन नं. २४३१६२७

**● सन २०१५-२०१६ सालातील २४/४/२०१६ पर्यंतचे पदाधिकारी व कार्यकारी मंडळ ●**

**● अध्यक्ष ●**

प्रा.मधुसूदन गजानन मुळे

**● उपाध्यक्ष ●**

श्री.डॉ. पारस देवीचंद कोठारी

श्री. विकास त्र्यंबकराव पाथरकर

श्री. अशोक माधवराव कानडे

श्री. रमण रतनचंद मुथ्था

**● कार्याध्यक्ष ●**

श्री. संजय दादा जोशी

**● उपकार्याध्यक्ष ●**

ॲड. अनंत रामचंद्र फडणीस

श्री. प्रकाश हिरालाल पोखर्णा

**● मानद सचिव ●**

श्री. सुनिल भगवान रामदासी

**● सह सचिव ●**

श्री. रामकृष्ण वामन जोगळेकर

सौ. रोहिणी अरविंद शिवलकर

श्री. शिरीष दामोदर मोडक

डॉ. रमेश मुरलीधर झरकर

श्री. अजित सिमरतमल बोरा

श्री. शशिकांत मोहनलाल भुतडा

श्री. सुरेश तात्याबा चव्हाण

श्री. अनिल बाळकृष्ण देशपांडे

**● कार्यकारी मंडळ ●**

श्री. वसंत हस्तीमल लोढा

श्री. संपतलाल धनराज बोरा

श्री. ब्रिजलाल झुंबरलाल सारडा

श्री. अरुणकुमार मुकनदास दुगड

श्री. रमेश बन्सीलाल सारडा

**● सेवक प्रतिनिधी ●**

श्री. कल्याण नामदेव लकडे

श्री. प्रा. शिवाजी सखाराम जोशी

श्री. विठ्ठल बाळू उरमुडे

श्री. अधिक सुरेश जोशी

श्री. सतिश रंगनाथ म्हसे

श्री. दिपक वसंतराव आरडे

**● सहाय्यक सचिव ●**

श्री. मोहन मधुकर गायकवाड

श्री. बाळासाहेब उध्दवराव कुलकर्णी

**हिंद सेवा मंडळ, अहमदनगर**
**बोरकर नगर, सावेडी रोड, अहमदनगर - ४१४ ००१. दूरध्वनी : ०२४१ - २४३१६२७**

**हिंद सेवा मंडळ सन २०१५-१६ * वार्षिक अहवाल ***

# मनोगत...!

सार्वजनिक क्षेत्रात वावरत असताना एक वाक्य मला नेहमी आठवत राहतं; किंबहुना आजमितीला 'ते' माझ्या जगण्याचा एक आधारच होऊन बसलंय...! हे वाक्य असं आहे, 'कार्य कठीण है, इसिलिए करने योग्य है । साधारण कार्य तो सभी करते है ।' मित्रांनो, विचारांची ही धारणा सर्व समाज मनात निर्माण झाली, विकसीत झाली तर उत्तमोत्तम आणि रचनात्मक कार्याची निर्मिती, उभारणी आणि भक्कम बांधणी तर होईलच पण त्याशिवाय एका चांगल्या, सुसंस्कृत समाजाचं आपण पहात असलेलं स्वप्नही नक्कीच प्रत्यक्षात येऊ शकेल. आपल्या हिंद सेवा मंडळाचा मानद सचिव म्हणून आधीच्या कार्यकाळात दोन वर्ष आणि आताचं एक वर्ष अशी तीन वर्ष काम पहात असताना नेमक्या या आणि अशाच विचारांचं काहीसं गारुड माझ्या मनात सतत आरुढ असे. ही जबाबदारी सक्षमपणे निभावीत असताना कार्यकारिणीतील माझे सर्व सहकारी, शिक्षक, प्राध्यापक वृंद आणि सर्व सभासद यांनी देखील सकारात्मक विचारांच्या अनमोल अशा श्रृंखलेतील एक मोती बनून निश्चित अशा विकासात्मक धारणेनं आणि दृढ विश्वासाने मला साथ दिली. प्रोत्साहन दिलं. प्रेरणा दिली. म्हणूनच गेल्या तीन वर्षांच्या कालखंडात आपल्या हिंद सेवा मंडळाला नगर जिल्ह्यातील एक सक्षम, प्रगतीच्या पथावर वेगाने वाटचाल करणारी आणि विद्यार्थ्यांचं सुरक्षित भवितव्य घडविणारी संस्था म्हणून नांवलौकिक मिळवून देणं साध्य होऊ शकलं. नक्कीच हे कार्य कठीण होतं, पण अशक्य नव्हतं. म्हणूनच संस्थेचा हा जगन्नाथाचा रथ ओढण्याचं बळ मला दिलंत त्याबद्दल सर्वांचा मी अतिशय ऋणी आहे.

'राष्ट्रोन्नतीसाठी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची संधी' हे आपल्या शतकोत्तर शैक्षणिक संस्था म्हणून नांवलौकिक मिळविलेल्या हिंद सेवा मंडळाचं ब्रीद....! आपल्या या संस्थेचा मानद सचिव या नात्याने संस्थेचा वार्षिक अहवाल आपणापुढे सादर करताना आज अतिशय आनंद होत आहे. संस्थेच्या इतिहासाच्या पानापानावर अतुल्य अशा कामगिरीचे शब्द आजही दिमाखाने मिरवीत आहेत. याच पानांवर नव्या युगाचा... नव्या क्षणांचा इतिहास आपल्या सर्वांच्या साक्षीने आणि साथीने गिरवताना मन आनंदानं भरुन आलं नसतं तरंच नवल...! हे भाग्य मला लाभतंय याचा आनंद मी शब्दात काय वर्णावा बरं....

मित्रांनो, गेल्या दोन-तीन वर्षात संस्थेत आमुलाग्र असे बदल झालेले आपल्याला निश्चितच जाणवतील. मागच्या वर्षी २०१६ मध्ये मंडळाच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली. या निवडणुकीला 'प्रगती पॅनल'च्या माध्यमातून सामोरं जात असताना काही 'शब्द' आम्ही आपणास दिले होते. आपण सर्वांनी या शब्दांवर विश्वास ठेऊन संस्थेच्या कारभाराची धुरा आमच्यावर सोपविली. आता जबाबदारी आमची आहे....

होय... आमचीच...! आणि आजही आम्ही सर्वांना आश्वस्त करतो की, दिलेल्या कोणत्याही शब्दापासून आम्ही मागे हटणार नाही... उलट अधिक धडाडीने, कार्यक्षमतेने आम्ही काम करू आणि येत्या काही काळातच सर्व आश्वासनांची पुर्ती करु... संस्थेच्या कारभाराची जबाबदारी सांभाळून आता एक वर्ष होत आलेलं आहे. या वर्षभराच्या काळातच अशा अनेक नवनवीन गोष्टी, बदल घडून आलेले आहेत की जे जर आपण पाहिले... अनुभवले तर आपल्यालाही मंडळाच्या कार्याचा अभिमानच वाटेल याची खात्री आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रात सध्या झपाट्याने बदल होत आहेत. शिकविण्याच्या पध्दती, त्यासाठी वापरण्यात येणारं साहित्य याबाबत नवनीवन संकल्पना प्रत्यक्षात येत आहेत. काळाचा वेगच एवढा प्रचंड वाढलाय; की त्या वेगाने धावल्याशिवाय आता कोणालाच गत्यंतर राहिलेले नाही, अर्थात, अनेक वर्षांनंतर कोणीतरी शिक्षणाच्या बाबतीत काहीतरी चांगला विचार करतोय, आपले विद्यार्थी जगाच्या शाळेत कुठंही कमी पडून नयेत, शिक्षणाच्या बरोबरीने त्यांच्यातील कौशल्यांचा विकास व्हावा, त्यांचं व्यक्तिमत्त्व सुदृढ व्हावं आणि अशा सक्षम व्यक्तिमत्त्वाचे विद्यार्थी आत्मविश्वासाने देशाच्या प्रगतीसाठी कार्यरत रहावेत असा विचार करतोय... हे सगळं तसं कौतुकास्पदच...! यासंदर्भात महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री मा. ना. विनोदजी तावडे यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच...! मा. ना. शिक्षणमंत्र्यांच्या अपेक्षेप्रमाणे आपल्या मंडळाच्या सर्व शाळा, महाविद्यालयं या काळ आणि वेगाच्या स्पर्धेत कमी पडू नयेत असा प्रयत्न आम्ही सतत करत राहिलो. आमच्या प्रयत्नांना आपल्या सर्व शिक्षण संस्था, त्यात कार्यरत असणारा कर्मचारी वर्ग, मंडळाचे पदाधिकारी यांनी भक्कम अशी साथ दिली. मला वाटते ही आपल्या संस्थेच्या उज्ज्वल भविष्याची जणुकाही चुणूकच आहे. मंडळाच्या पारदर्शी आणि सचोटीचे व्यवहारांना त्याचबरोबर समाजात दिवसागणिक वाढत असलेल्या विश्वासार्हतेला दिलेली ही दाद आहे.

मागच्यावर्षी आपण आपल्या सर्व शाळांमधून ई-लर्निंग आणि डिजिटल क्लासरुम तयार करण्याचा विचार केला होता. सांगायला आनंद होतो की त्यानुसार आपली वाटचाल सुरुही झालेली आहे. नगर शहरातील श्रीमती पार्वतीबाई डहाणुकर विद्यालय लवकरच पूर्णतः डिजिटल होण्याच्या मार्गावर आहे. दादा चौधरी विद्यालय आणि दादा चौधरी मराठी विद्यालयात देखील विशेष संगणक कक्ष विकसीत करण्यात आला आहे. सीताराम सारडा विद्यालयातही डिजिटल क्लासरुम बनविण्याचे काम प्रगती पथावर आहे. श्रीरामपूर विभागातील सर्व शाळांमधूनही हे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. अगदी लवकरच हिंद सेवा मंडळाच्या सर्व शाळा शासनाच्या अपेक्षेप्रमाणे पूर्णतः डिजिटल होतील याची खात्री आहे. गेल्या तीन वर्षांत मंडळाच्या विविध शैक्षणिक संस्थांमधून प्रगतीचे वारे वाहू लागले आहे. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुधार प्रक्रिया आपण राबवीत आहोत. नव्या पध्दतीनुसार आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य आणि त्याच बरोबर आपल्या भौतिक सुविधा यामध्ये लक्षणीय सुधारणा झालेली आपल्याला दिसून येईल. मागच्या अहवालात आपण पेमराज सारडा महाविद्यालयाच्या आकर्षक प्रवेशद्वारा संबंधी बोललो होतोच. या वर्षभरात आपण

मिरजगांव येथील शाळेच्या इमारतीची दुरुस्ती केली. तिथे संरक्षक भिंत बांधली. आकर्षक अशा प्रवेशद्वाराचे काम पूर्णत्वास आलेले आहे. श्रीरामपूर मध्ये शां. ज. पाटणी विद्यालयाच्या संरक्षक भिंतीचे तसेच बालवाडी नुतनीकरणाचे काम आपण पूर्ण केले. दादा वामन जोशी विद्यालयासाठी आकर्षक असे प्रवेशद्वार तयार केले. क. जे. सोमैय्या विद्यालयाच्या इमारतीला रंग दिला आहे. त्यामुळे इमारत अतिशय आकर्षक दिसत आहे. अकोल्यातील ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या दुसऱ्या मजल्याचे काम पूर्ण केलं आहे. सीताराम सारडा विद्यालयात पेव्हिंग ब्लॉक्स बसवले आहेत. मंडळाचे कार्यालय आणि महाविद्यालय या मध्ये असलेल्या खेळाच्या मैदानाचा पुरेपूर वापर विद्यार्थ्यांना करता यावा यासाठी संरक्षक भिंत आपण बांधली आहेच.

शालेय पातळीवर विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीस लागावी यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम आपण राबवित असतो. त्या माध्यमातून आपल्या अनेक विद्यार्थ्यांनी याच बळावर अनेक स्पर्धांमधून लक्षणीय यश संपादन केले आहे. विद्यार्थी घडविण्याची जबाबदारी प्रामुख्याने ज्या शिक्षकवृंदांवर आहे त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी देखील मंडळाने पुढाकार घेतला. जेणे करून शिक्षक तणावमुक्त वातावरणात आपले ज्ञानदानाचे काम अधिक तळमळीने करू शकतील. शिक्षकांच्या सेवापुस्तिका, वैद्यकीय बिले, पदोन्नती या सारख्या विषयातील त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना उचित न्याय देण्याचे काम या काळात झाले. त्यामुळे सर्व कर्मचारी व मंडळ यांच्यामध्ये स्नेह आणि आपुलकीचा बंध तयार झालेला आहे.

मंडळाच्या पारदर्शी आणि विश्वासार्ह्य कारभारामुळे समाजात सकारात्मक संदेश गेला. त्याचा परिणाम ठेवींमध्ये लक्षणीय वाढ होण्यात झाला. या ठेवींवरील व्याजही आता मोठ्या प्रमाणात मिळू लागले आहे. त्यामुळे लक्षणीय सुधारणा करण्यासाठी पुरेसा निधी आपल्याला खेळत्या भांडवलाच्या स्वरुपात उपलबध होऊ शकतो. मंडळाचे वेळच्यावेळी लेखा परिक्षण केले जाते. आर्थिक व्यवहारांमध्ये वाढ होतानाच त्यात पारदर्शकताही आणली आहे. या सर्व बदलांमुळे मंडळ चांगली प्रगती करीत असून आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण इथून पुढेही यशाचा मोठा टप्पा नक्कीच गाठू असा मला विश्वास आहे.

भविष्यातील प्रगतीच्या दृष्टीने अनेक नव्या योजनांची आखणी मंडळाने केलेली आहे. त्यात भि. रा. खटोड कनिष्ठ महाविद्यालयासाठी नवी इमारत, शासन निर्णयानुसार सर्व शाळा डिजिटल करणे, पेमराज सारडा महाविद्यालयाच्या विद्यार्थी वसतीगृहाच्या ठिकाणी नव्याने इमारत उभी करून कौशल्य विकसन केंद्र बनविण्याचा मानस, भारत विद्यालयाची नवी इमारत बांधणे तसेच त्या ठिकाणी नव्याने प्राथमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय तसेच १० वी साठी परीक्षा केंद्र म्हणून मान्यता मिळविणे, अकोले येथे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणे, नव्याने वर्ग खोल्यांचे बांधकाम करणे, श्रीरामपूर येथे भि. रा. खटोड कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे नव्याने सायन्स व कॉमर्स विभाग सुरू करणे, शां. ज. पाटणी विद्यालयात १ ली ते ४ थी पर्यंतचे वर्ग सुरू करणे, नगर येथील शाळांसाठी स्कूल बस सुरू करणे, पेमराज सारडा महाविद्यालयात नॅकच्या दृष्टीने तयारी करणे व त्याची पूर्तता करणे, सीताराम सारडा विद्यालयाच्या इमारतीसाठी आकर्षक

कमान तयार करून रंगकाम करणे इ. विविध स्वरुपांच्या कामांचा समावेश आहे. मला खात्री आहे की नजिकच्या काळातच ही सर्व कामे मार्गी लागलेली आपल्याला पहायला मिळेल.

शिक्षणाच्या क्षेत्रात नित्यनव्याने होणारे रचनात्मक बदल अंगिकारून मंडळाने आपली शैक्षणिक प्रगतीची गंगा सदैव वाहती ठेवण्याचा निश्चय केलेला आहे. अनेकविध आव्हाने समोर असताना देखील त्यावर मात करीत पूर्वसुरींनी घालून दिलेला राष्ट्रीयत्वाचा बाणा जपण्याचा प्रयत्न केलाय. शिक्षण हेच व्रत असे मानून एकनिष्ठेने काम करणारी एकमेव शतकोत्तर संस्था म्हणून आपली ओळख हिंद सेवा मंडळाने प्राणपणाने जपली आहे. शाळा महाविद्यालयांमधून वार्षिक नियोजन करून अध्यापकांना त्यांच्या नियोजनासाठी केलेल्या मार्गदर्शनामुळे आपल्या अनेक विद्यार्थ्यांनी परीक्षांमध्ये लक्षणीय असे यश संपादन केले. त्याचा आज विशेष अभिमान वाटतो.

गेल्या वर्षभराच्या काळात माननीय आजीव सभासद, अध्यापक व कर्मचारी, हितचिंतक, शासकीय अधिकारी वर्ग, पत्रकार अशा सर्वांनी संस्थेची आस्थेने चौकशी केली व कार्याबद्दल आनंद व्यक्त केला याचे समाधान आहे. आपला विद्यार्थी वर्ग, कर्मचारी, शाळांचे निकाल, संस्थेची स्थावर मालमत्ता या संदर्भातील माहिती आपणास उपलब्ध होईलच. संस्थेचा एकूण कारभार व संस्थेने साधलेली प्रगती याबाबत सर्वांनीच व्यक्त केलेले समाधान हीच आपली यशाची पावती आहे. शेवटी संस्थेचा कारभार म्हणजे जगन्नाथाचा रथ आहे. तो पुढे नेण्यासाठी आपल्या सर्वांच्या सूचना, मार्गदर्शन व सहकार्य अपेक्षित आहे. त्याच बळावर संस्था पुढील यशस्वी वाटचाल करेल असा विश्वास आहे. आपण आपल्या सूचना, कल्पना लिखित स्वरुपात मंडळाच्या कार्यालयात पाठवाव्यात. त्याचे नक्कीच स्वागत केले जाईल.

मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीषजी मोडक, कार्याध्यक्ष ब्रिजलालजी सारडा यांनी या कामासाठी प्रेरणा दिली. विश्वास दाखविला व सर्व कार्यासाठी प्रोत्साहन दिले, मार्गदर्शन केले त्याबद्दल मी अत्यंत ऋणी आहे. संस्थेच्या सर्व शाळांचे स्कूल कमिटीचे चेअरमन यांनीसुध्दा अतिशय चांगल्या प्रकारे काम करून मंडळाच्या वैभवात व शैक्षणिक गुणवत्तेत भर घातली याचा निश्चितच अभिमान आहे. सर्व आजी–माजी पदाधिकारी, सर्व आजीव सभासद, कार्यकारिणी सदस्य, सर्व स्कूल कमिटीचे सदस्य, कर्मचारी वर्ग, प्राथमिक व माध्यमिक विभागाचे मान्यवर, जिल्हा शिक्षणाधिकारी व त्यांचे सहयोगी, पुणे विद्यापीठाचे अधिकारी, जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी, वृत्तपत्रांचे संपादक व वार्ताहर, विद्यार्थ्यांचे पालक, मंडळाचे माजी पदाधिकारी, माजी विद्यार्थी, विविध कार्यालयातील शासकीय अधिकारी अशा सर्वांच्या अतुलनीय सहयोगामुळे संस्था शिक्षणाच्या क्षेत्रात अग्रेसर आहे. या सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

संस्थेचा जमाखर्च व ताळेबंद पत्रक आपणासमोर सादर करीत आहे. त्यास मान्यता द्यावी, ही विनंती.

**सुनिल भगवान रामदासी**
**मानद सचिव,**
**हिंद सेवा मंडळ, अहमदनगर**

# लेखा परीक्षकांचा अहवाल

आम्ही हिंद सेवा मंडळ, अहमदनगर यांचे सोबत जोडलेल्या ३१ मार्च, २०१६ च्या दिनांकाच्या ताळेबंदाचे तसेच ३१ मार्च, २०१६ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या आयव्यय पत्रकांचे परीक्षण केले असुन असा अहवाल देतो की –

१) आमच्या लेखा परीक्षणाचे उद्देशांसाठी, आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत.

२) आमच्या मते आणि आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे देण्यात आलेल्या खुलाश्याप्रमाणे –

अ) संस्थेचा ताळेबंद व आयव्यय पत्रके, संस्थेच्या हिशोबांचे पुस्तकांशी व विवरणांशी जुळत असून हे ताळेबंद या अहवालास व लेखा परीक्षण अहवालातील सामान्य शेरे व सूचना यामध्ये निर्देशिलेल्या त्रुटीस पात्र राहून, संस्थेची ३१ मार्च, २०१६ रोजीची आणि आयव्यय पत्रकाची त्या तारखेअखेर संपणाऱ्या वर्षाची आयची (सरप्लसची) सत्य व यथार्थ परिस्थिती दर्शवितात.

ब) संस्थेचे हिशोब त्यासंबंधी दिलेल्या अहवालातील सामान्य शेरे व सूचना यामध्ये निर्देशिलेल्या त्रुटीस पात्र राहून संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व यथार्थ परिस्थिती दर्शवितात.

**मेसर्स एस्.व्ही. गुर्जर आणि कंपनी करिता**

**ठिकाण – अहमदनगर**
**दिनांक : ०४/०२/२०१७**

**ए. एस्. गुर्जर**
चार्टर्ड अकौटंट

# हिंद सेवा मंडळ,
# एकत्रित ताळेबंद पत्रक

| भागभांडवल व देणी | रुपये | रुपये |
|---|---|---|
| ट्रस्ट फंड / निधी | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | २९,०९,५०१.३७ |
| इतर निधी | | ७,४५,८१,३०७.९३ |
| <u>जबाबदाऱ्या व देणी</u> | | १,४९,५९,६६७.१३ |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ४,४६,४१,९०६.६४ | |
| अधिक - चालू वर्षाचा वाढावा | ५९,३३,८११.३१ | |
| वजा - दादा चौधरी मराठी शाळा | -२,८९०.८० | ५,०५,७२,८२७.१५ |
| एकूण | रु. | १४,३०,२३,३०३.५८ |

## अहमदनगर
## दिनांक ३१ मार्च २०१६

| मालमत्ता व येणी | रुपये | रुपये |
|---|---|---|
| स्थावर मालमत्ता | | |
| जमीन व इमारत | | ५,३९,३४,९०८.२१ |
| गुंतवणूक | | २,९४,८१,८५४.६६ |
| फर्निचर / पुस्तके | | १,५२,३९,६३२.०० |
| कॉम्प्युटर्स | | १,७३,९५०.०० |
| येणी | | १,९३,८९,८६२.९३ |
| टी. डी. एस. मंडळ | | |
| २०१३-१४ | ३५,५४८.०० | २,१५,३०१.०० |
| २०१५-१६ | ८०,६४४.०० | |
| २०१६-१७ | ९९,१०९.०० | |
| भांडवल उद्योगमंदीर | | २,३६,२४३.३७ |
| विकास सोप फॅक्टरी भांडवल | | ४,७०,०००.०० |
| रोख व बँक शिल्लक | | |
| मंडळाची | १५,०१,९११.१६ | |
| शाळा, कॉलेज, हॉस्टेलची | २,२३,७९,६४०.२५ | २,३८,८१,५५१.४१ |
| एकूण | रु. | १४,३०,२३,३०३.५८ |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालाप्रमाणे

ठिकाण - अहमदनगर
दिनांक : ०४/०२/२०१७

मे. एस. व्ही. गुर्जर ॲण्ड कंपनी
चार्टर्ड अकौटंट

# हिंद सेवा मंडळ,
# एकत्रित जमा खर्च

| जमा | रुपये | रुपये |
|---|---|---|
| इमारत भाडे मंडळ | | ११,७१,५८५.६० |
| बँक व्याज | | ५,२२,३०६.५० |
| देणगी – मंडळ रोख स्वरुपात | | |
| अनुदान खाते | | ३४,४३,४०१.०० |
| सरकारकडून शाळा कॉलेज | | २७,७५,२४,९५६.०० |
| अनुदान | | |
| <u>इतर उत्पन्न</u> | | |
| शाळा कॉलेज खाते – फी | २,३०,२७,६१९.०० | |
| शाळा कॉलेज खाते – इतर | ५९,८९,२७१.३० | |
| मंडळाचे | १,६९,४३५.०० | २,९१,८६,३२५.३० |
| एकूण | रु. | ३१,१८,४८,५७३.९० |

## अहमदनगर
## दिनांक ३१ मार्च २०१६

| खर्च | रुपये | रुपये |
|---|---|---|
| मालमत्तेवरील खर्च<br>म्युन्सिपल टॅक्स मंडळ | | ३,१४,४०४.०० |
| व्यवस्थापकिय खर्च | | ७,३४,८२०.०० |
| कोर्ट खर्च | | २,८४,५०४.०० |
| ऑडीट फी | | २२,९००.०० |
| घसारा - मंडळ | | ८,७४,०९३.०० |
| संस्थेच्या उद्देशांवर खर्च | | ३०,३६,८४,०४१.५९ |
| वाढवा वर्ग | | |
| स्कूल व कॉलेज<br>मंडळ खाते | २८,६३,८०८.७१<br>३०,७०,००२.६० | ५९,३३,८११.३१ |
| एकूण | रु. | ३१,१८,४८,५७३.९० |

ठिकाण - अहमदनगर

दिनांक : ०४/०२/२०१७

# हिंद सेवा मंडळ,
# अंदाज पत्रक

## (उत्पन्न)

| तपशिल | प्रत्यक्ष (२०१५-१६) | अंदाज (२०११६-१७) |
|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | | |
| मंडळ | १७,६६,२२२.०० | १५,०१,९११.०० |
| शाळा, कॉलेज | २,११,६९,७८४.०० | २,२३,७९,६४०.०० |
| मंडळ खाते | | |
| देणगी / निधी | ३४,४३,४०१.०० | ३७,७८,५००.०० |
| व्याज (मुदत ठेव व बँक) | ५,२२,३०६.०० | ५,७५,०००.०० |
| शाळा खाते | | |
| शासकिय अनुदान | २७,७५,२४,९५६.०० | ३०,१७,७७,५००.०० |
| फी | २,३०,२७,६१९.०० | २,५३,३०,०००.०० |
| इतर | ५९,८९,२७१.०० | ६६,८८,२००.०० |
| एकूण रु. | ३३,३४,४३,५५९.०० | ३६,२०,३०,७५१.०० |

## अहमदनगर

## २०१६-२०१७ (खर्च)

| तपशिल | प्रत्यक्ष (२०१५-१६) | अंदाज (२०१६-१७) |
|---|---|---|
| मंडळ खर्च | | |
| म्युनिसिपल टॅक्स | २,५९,५०७.०० | ३,१५,०००.०० |
| व्यवस्थापकिय खर्च | ७,४३,८२०.०० | ७,५०,०००.०० |
| उद्देशांवर खर्च | ३०,३६,८४,०४२.०० | ३३,४०,५२,५००.०० |
| घसारा मंडळ | ८,७४,०९३.०० | ७,८६,७००.०० |
| कोर्ट खर्च | २,८४,५०४.०० | ३,००,०००.०० |
| फर्निचर व पुस्तके | ३६,२४,८४२.०० | ४०,४५,५५१.०० |
| अखेरची शिल्लक | | |
| मंडळ | १५,०१,९११.०० | १७,५१,०००.०० |
| शाळा, कॉलेज | २,२३,७०,८४०.०० | २,००,३०,०००.०० |
| निवडणूक खर्च | १,००,०००.०० | |
| एकूण रु. | ३३,३४,४३,५५९.०० | ३६,२०,३०,७५१.०० |

ठिकाण - अहमदनगर

दिनांक : ०४/०३/२०१७

# हिंद सेवा मंडळ, अहमदनगर

## ● शाळांचे फोन नंबर ●

| क्र. | शाळेचे नांव | शाळेचे फोन नंबर |
|---|---|---|
| १) | पेमराज सारडा कॉलेज वरिष्ठ महाविद्यालय, अ.नगर | (0241) 2431337<br>(0241) 2431433 |
| २) | पेमराज सारडा कॉलेज कनिष्ठ महाविद्यालय, अ.नगर | (0241) 2431337<br>(0241) 2431433 |
| ३) | सीताराम सारडा विद्यालय,अ.नगर | (0241) 2431776 |
| ४) | श्रीमती पा.ड.कन्या विद्यालय,अ.नगर | (0241) 2343164 |
| ५) | दादा चौधरी विद्यालय,अ.नगर | (0241) 2345328 |
| ६) | दादा चौधरी मराठी शाळा,अ.नगर | (0241) 2324553 |
| ७) | हिंद सेवा मंडळाची प्राथ.शाळा,अ.नगर | (0241) 2431776 |
| ८) | मेहेर इंग्लिश स्कूल, अ.नगर. | (0241) 2345328 |
| ९) | भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, अ.नगर. | (0241) 2321681 |
| १०) | क.जे.सामैय्या हायस्कूल, श्रीरामपूर | (02422) 222289 |
| ११) | भि.रा.ख. कन्या विद्यालय, ज्युनिअर कॉलेज, श्रीरामपूर. | (02422) 222415 |
| १२) | भि.रा.ख. कन्या विद्यालय, श्रीरामपूर. | (02422) 222415 |
| १३) | भि.रा.ख. कन्या विद्यालय होम सायन्स,श्रीरामपूर | (02422) 222415 |
| १४) | शां.ज. पाटणी विद्यालय,श्रीरामपूर | (02422) 222370 |
| १५) | दादा वामन जोशी नवीन मराठी शाळा, श्रीरामपूर | (02422) 223415<br>(02422) 227078 |
| १६) | डॉ. बा.ग. कल्याणकर रात्र प्रशाला, श्रीरामपूर | ------------- |
| १७) | मॉडर्न हायस्कूल ज्युनि.कॉलेज, अकोले | (02424) 221242 |
| १८) | मॉडर्न हायस्कूल, अकोले | (02424) 221242 |
| १९) | ज्ञानवर्धिनी प्राथ.शाळा, अकोले | (02424) 223116 |
| २०) | भारत विद्यालय, मिरजगांव | (02489) 263274 |
| २१) | रामकरण सारडा वसतीगृह | (0241) 2411128 |